विशेष लेख क्र.  २९०

१८ आश्विन १९२८ शके (सायं. ५.३० वा.)
मंगळवार, दि.१० ऑक्टोबर २००६

## मेट्रो रेल्वे : आरामदायी प्रवास

*मुंबई शहर महाराष्ट्राची राजधानी, पंतप्रधान डॉ.मनमोहनसिंग यांनी मुंबईचे महत्त्व जागतिक स्तरावर वाढविण्यासाठी मुंबईच्या विकासात विशेष लक्ष घातले आहे. मुंबई शहर शांघाय धर्तीवर बनविताना शहरात पायाभूत सुविधांचा उत्तम प्रकारे विकास होणे गरजेचे आहे. परदेशी गुंतवणुक दारांना आकर्षिक करण्यासाठी मुंबई विकासाच्या विविध योजना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने हाती घेतल्या असून मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प त्यापैकीच एक आहे. मुंबई मेट्रो रेल्वेच्या विविध टप्प्यांची माहिती देणारा हा लेख...*

बोरीबंदर ते ठाणे अशा रेल्वेच्या छानदार प्रवासाला सुरुवात १८५३ मध्ये झाली. यानंतर ट्रामगाडी आली. नंतर विजेवर धावणा-या लोकलगाडयांना १९२८ मध्ये प्रारंभ झाला. मुंबईचे उपनगर आणि महानगर हे वाहतुकीच्या साधनांनी चांगल्यापैकी गुंफले गेले. तीन दशकात उपनगरातील लोकसंख्या ५० लाखांवरुन ८८ लाखांवर गेली.  आजमितीस मुंबई शहरातील सुमारे १ कोटी २० लाख  पैकी जवळ जवळ १० लाख प्रवासी रेल्वेने प्रवास करतात. २००२ आर्थिक गणणेनुसार बृहन्मुंबईमध्ये ६३ हजार ६७९ टॅक्सी आणि १ लाख १ हजार ८२९ ऑटो रिक्षा आहेत. मुंबई महानगरप्रदेशासाठी तयार केलेल्या महानगर प्रदेश आराखडयानुसार मुंबईची लोकसंख्या २०११ साली १ कोटी  ९० लाख होईल अणि वाहनांची संख्या ६ ते ८ टक्के इतक्या भरमसाठ गतीने वाढेल असा अंदाज आहे.

सध्या लाखो मुंबईकर उपनगरीय रेल्वेच्या तीन मार्गावरुन दररोज प्रचंड गर्दीत प्रवास करतात. या पार्श्वभूमीवर मुंबई शहराच्या वाहतुकीचा चेहरामोहरा बदलून टाकणा-या आणि पूर्व पश्चिम उपनगरांना जोडणा-या मेट्रो रेल्वेचे काम आता सुरु होत आहे. मुंबईकरांना निश्चितच दिलासा मिळेल.  सुरुवातीस ३ डब्यांची असणारी मेट्रो, लोकसंख्या विचारात घेऊन ८ डब्यांपर्यंत वाढविण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात, कुलाबा बॅकबे माहीम चारकोप ही ३६ कि.मी. वर्सोवा-अंधेरी घाटकोपर १५ कि.मी. सेवा तर दुस-या टप्प्यात माहीम-मानखुर्द १२.८ कि.मी.चारकोप-दहिसर ७.५ कि.मी. आणि घाटकोपर मुंलुड-१२.४ कि.मी. सेवा राहणार आहे.  तिस-या टप्प्यात वांद्रे, कुर्ला संकूल-विमानतळ कांजूरमार्ग सेवा १९.५ कि.मी. सेवा अंधेरी-पूर्व दहिसर पूर्व- १८ कि.मी. आणि हुतात्मा चौक घाटकोपर  २१.८ कि.मी. तर शिवडी प्रभादेवी ३.५ कि.मी. याचा अंतर्भाव राहाणार आहे. मुंबई मेट्रो रेल्वे मार्गाचा एकूण खर्च (एप्रिल २००३ )च्या भाव पातळीनुसार १९ हजार ५२५ कोटी रुपये इतका आहे. या  मार्गाची लांबी ११ कि.मी. असून यावर १२ स्थानके असतील. सर्व गाडया वातानुकुलीत तसेच सर्व स्थानके लिफ्ट्स आणि इतर सुविधांनी सुसज्ज असणार आहेत. अत्याधुनिक सुविधा, स्वयंचलित तिकीट यंत्रणा आणि बससेवेच्या दीडपट-लोकांना परवडेल अशी भाडे आकारणी राहणार आहे. विशेष सुरक्षा व्यवस्था आणि इको- फ्रेन्डली यंत्रणा ही मेट्रोची महत्त्वाची वैशिष्टये आहेत. तसेच हा मार्ग २०१० मध्ये प्रवाशांसाठी  खुला होईल.

पश्चिम द्रुतगती महामार्ग, त्याच्या बाजूने धावणारी पश्चिम रेल्वे, त्यावरुन धावणारी मेट्रो रेल मुंबईकरांच्या अतिशय धकाधकीच्या जीवनात आरामदायी प्रवासाचे स्वप्न साकारेल. या मेट्रो रेल्वेची चकचकीत स्थानके, वातानुकुलीत यंत्रणा, अत्याधुनिक सुविधांचा लाभ दररोज सुमारे साडेचार लाख प्रवाशांना मिळणार आहे.

..२/-

सध्या वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर हा ७१ मिनिटांचा प्रवास २१ मिनिटात पूर्ण करणारा हा मेट्रो रेल्वे प्रकल्प मुंबईकरांसाठी निश्चितच दिलासा देणारा आहे.

मुंबईतील वाहतूक क्षेत्रात सुधारणा घडवून आणण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने जागतिक बँकेच्या अर्थ सहाय्याने ४ हजार ५२६ कोटी खर्चाचा मुंबई नागरी परिवहन प्रकल्प (एमयुटीपी) हाती घेतला आहे. या प्रकल्पाचा मुख्य भर उपनगरीय रेल्वे सुधारण्यावर आहे. मुंबईसाठी मेट्रो रेल सेवेचे सर्वंकष जाळे सुचविणे आणि त्यापैकी निवड केलेल्या भागाचा प्रकल्प अहवाल तयार करणे यासाठी दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन या संस्थेची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

१९९६ ते २०११ या कालावधीकरिता प्राधिकरणाने तयार केलेल्या महानगर प्रदेश आराखडयात बहुविध विकास केंद्रे ही संकल्पना घेऊन भविष्यातील जमीन वापर सुचविण्यात आलेला आहे. विद्यमान आणि भविष्यकालीन लोकसंख्या, रोजगार, गाडयांची मालकी, त्यांची वाढ या सर्व गोष्टींचा विचार करुनच मुंबई मेट्रो रेल्वेचा आराखडा तयार करण्यात आलेला असून, त्यामध्ये पर्यायी रोजगार सेवा केंद्रे, जसे वांद्रे-कुर्ला संकूल, नवी मुंबई, कापड गिरण्या पुनर्विकास प्रकल्प याचा विचार करण्यात आलेला आहे. या सर्वंकष आराखडयानुसार १४६.५ किलो मीटर लांबीचा मेट्रो रेल्वे मार्ग असून, त्यापैकी ३२.५ कि.मी. पैकी २२ टक्के भुयारी व ११४ कि.मी. पैकी ७८ टक्के जाणार आहे.

मेट्रो रेल्वे प्रकल्प हाती घेतांना सर्वंकष विकास आराखडयांचे टप्पेही ठरविण्यात आले आहेत. त्यामध्ये तीन टप्प्यांचा समावेश आहे. यामध्ये वाहतूक, बांधकाम खर्च, पर्यावरण यांचाही प्रामुख्याने विचार करण्यात आलेला आहे.

चारकोप-बान्द्रा-मानखुर्द या मेट्रो रेल्वे मार्गाची लांबी ३१.८७ कि.मी. असून या मार्गावर २७ स्थानके असतील.

चारकोप येथे २० हेक्टर क्षेत्रावर तर मानखुर्द येथे १९ हेक्टर क्षेत्रावर डेपो उभारण्यात येणार आहे. तर बांधा-वापरा हस्तांतरीत करा - या तत्वावर हा मार्ग उभारण्यात येणार असून खाजगी भागीदारीतून उभ्या राहणा-या या प्रकल्पाची किंमत ४ हजार ६६४ कोटी आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि राज्य शासनाच्यावतीने १ हजार ६५८ कोटीचे म्हणजेच ३० टक्के भांडवल उभारणार आहे. या मार्गापासून प्रत्यक्ष महसूल १ डिसेंबर २०११ पासून मिळण्यास सुरुवात होईल.

मुंबई शहराच्या सौंदर्यात ही मेट्रो रेल्वे भर टाकणार असून प्रवाशांना सुखकारक व आरामदायी प्रवास हे ध्येय प्रामुख्याने डोळयासमोर ठेवण्यात आले आहे. प्रवाशांना दररोज जीवघेण्या गर्दीतून प्रवास करण्यापासून या प्रकल्पामुळे निश्चितच मुक्तता मिळेल असा विश्वास वाटतो.

श्रीपाद नांदेडकर
वरिष्ठ सहाय्यक संचालक (माहिती)

०००